# <u>प्रेसनोट</u>

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा. क्रं. 118/2024 दिनांक : 31.03.2024**

## 1)खुनाचा प्रयत्न :–

**कुंटुर :–** दिनांक 29.03.2023 रोजी 19.30 वा. चे सुमारास, **मौजे. सांगवी ता. नायगाव जि. नांदेड येथे**, यातील नमुद चार आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादीस मोटार सायकल धुतलेले पाणी घरासमोर आल्याच्या कारणावरून यातील नमुद आरोपीतांनी यांचे ताब्यातील ट्रॅक्टर यातील फिर्यादी व साक्षीदार यांचे पायावर घालुन पायास गंभीर दुखापत करून पाय मोडला व त्यांचे हातातील लोखंडी रॉड व काठीने डोक्यात व पाठीत मारहाण केली व शिवीगाळ करून खुन करण्याचा प्रयत्न केला व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी संतोष गंगाधर वडजे, वय 34 वर्षे, व्यवसाय खाजगी नोकरी सांगवी ता. नायगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे कुंटुर** गुरनं 60/2024 कलम 307,324,323,294,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउनि/श्री पोले, मो.क्रं. 9823210420** हे करीत आहेत.

## 2)चोरी :–

**नांदेड ग्रामीण** :– दिनांक 30.03.2024 रोजी 03.15 वा. सुमारास, **वसरणी येथे क्रेशर जवळ कच्चा व खडयाचे रस्त्यावर ता. जि. नांदेड येथे**, यातील फिर्यादीची गाडी ही वसरणी येथे क्रेशर जवळ कच्चा व खडयाचे रस्त्यावर गाडी स्लो झाल्याने कोणीतरी अज्ञात आरोपीने पाठीमागुन गाडीवर चढुन ताडपत्री व रस्सी कट करून गाडीतील मालापैकी सर्वप्युअर रिफाईंड सोयाबीन तेलाचे 15 किलोचे प्लॅस्टीकचे 9 कॅन प्रत्येकी किंमती 1570/–रू असा एकुण 14,130/–रू चा माल चोरून नेला. वगैरे **फिर्यादी इमरानखान मजहरखान, वय 32 वर्षे, व्यवसाय चालक रा. वाशिम बायपास अकोला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 260/2024 कलम 379, भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1224 सुर्यवंशी, मो.क्रं. 8329712505** हे करीत आहेत.

## 3)गंभीर दुखापत :–

**वजिराबाद :–**दिनांक 29.03.2024 रोजी 18.40 वा. चे सुमारास, **महानगर पालीका ऑफिस समोर वजिराबाद, नांदेड येथे**, यातील फिर्यादी हे त्यांचे कोर्टाचे कामकाज संपवुन घरी जात असताना यातील नमुद आरोपीने शिवीगाळ करून हातातील लोखंडी रॉडने फिर्यादीचे डोक्यात कानावर मारहाण करून गंभीर दुखापत केली व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी व्यंकटेश रामराव चिलकेवार, वय 50 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. चौफाळा भोपळे हॉस्पीटल, नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 153/2024 कलम 326,324,504,506,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री लोणीकर मो. नं. 9422336474** हे करीत आहेत.

## 4)फसवणुक :–

**1)नांदेड ग्रामीण :–** दिनांक 29.03.2024 रोजी 18.15 वा. चे सुमारास, **अशिफखान एम.जी.आर. समोर यांचे राहते घरी मिलतनगर, नांदेड येथे**, यातील नमुद पाच आरोपीतांनी संगणमत करून बिना परवाना बेकायदेशिररीत्या नमुद ठिकाणी बनावट व्हि एच पटेल आणि कंम्पनी चाळीसगाव जि. जळगाव या कंपणीच्या तोटयावरील हुबेहुब दिसणारे लोगो त्यावरील चिन्हे, आकृत्या नावे वापरून आरोपीने स्वतःचे आर्थीक फायदयासाठी बनावट सुर्यछाप तोटा तंबाखु भरण्यासाठी पुंगळया त्यासाठी लागणारे प्रिपेड कागद बनावट सुर्यछाप तोटयाचे पुडडा पॅक करण्यासाठी लागणारे प्रिंटेड कागद, सुर्यमुखाचे चिन्हे असणारे प्रिंटेड कागद बनावट सुर्यछाप तोटयाचे पॅकींग केलेले तोटयाचे पुडे व त्यासाठी वापरण्याचा नकली तंबाखु तसेच गुटखा, बिडी यांचे प्रिंटेड कागद व पॉलीथीन मिळुन एकुण 19,75,200/–रू माल चोरटया मार्गाने विकण्यासाठी ताब्यात बाळगुण मुळ कंपणीची फसवणुक केली. वगैरे **फिर्यादी पोना/2590 अर्जुन केशव मुंडे, ने. पोस्टे नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं. 258/2024 कलम 328, 468, 471, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री गायकवाड, मो.नं. 9823236453** हे करीत आहेत.

**2)नांदेड ग्रामीण :–** दिनांक 27.09.2023 ते दि.16.01.2024 चे दरम्यान, **चंदासिंग कॉर्नर तुप्पा ता. जि. नांदेड येथे**, यातील नमुद नऊ आरोपीतांनी संगणमत करून षंडयत्र रचुन व विविध प्रकारे गुन्हा 7/12 फेरफार सारखा महत्वाचा व मौल्यवान शासकीय दस्ताऐवज जे तक्रारदाराचे नावे होता तो रद्द करून बिना बेकायदेशिर मौल्यवान शासकीय दस्ताऐवज स्वतःचे व एक मरण पावलेल्या व्यक्तीच्या नावे करून फसवणुक केली. वगैरे **फिर्यादी अल्ताफ इलाही खान अहमद खान, वय 82 वर्षे, व्यवसाय पेन्शनर रा. इलाही मंजील निजाम कॉलनी श्रीनगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं. 261/2024 कलम 420, 463, 464, 465, 466, 467, 468, 477 ए, 107, 117, 119,175, 176, 182, 187, 196, 199, 200, 33, 34, 35, 36, 37 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री मटवाड, मो.नं. 9922778115** हे करीत आहेत.

**3)नांदेड ग्रामीण :–** दिनांक 17.02.2024 रोजी 10.45 वा. ते दिनांक 19.01.2024 पावेतो, **सिडको, नांदेड येथे,** यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस शादी डॉट कॉम या वेबसाईटवर गिफ्टचे आमीष दाखवुन पार्सल बॉक्स मध्ये 6000/–रू पाऊंडस विदेशी पैसे आहेत ते तुम्हाला भारतीय रूपयामध्ये हस्तांतर करून घ्यावे लागेल त्यासाठी तुम्हाला त्यावर कस्टम डयुटी म्हणुन 9 टक्के लागतील व सदरील विदेशी चलन भारतीय चलनामध्ये करून देतो असे विश्वासघात घेवुन वेळोवेळी फोनवरून पैशाची मागणी करून धमकी देवुन विवीध अकाऊंटवर पैसे भरायला लावुन एकुण 1,45,700/–रू ची आर्थीक फसवणुक केली. वगैरे **फिर्यादी बालाजी दिलीपसिंह तेहरा, वय 26 वर्षे, व्यवसाय शिक्षण रा. संभाजी चौक, सिडको नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं. 262/2024 कलम 420, 419, 504, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोनि/श्री गणेश चव्हाण, मो.नं. 9923416949** हे करीत आहेत.

## 5)शासकीय कामात अडथळा :–

**हदगांव :–** दिनांक 30.03.2024 रोजी चे 21.55 वा. चे सुमारास, **नवी आबादी घरकुल डीपी हदगाव ता. हदगांव जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने फिर्यादीस लाईट बंद झाली लाईट लवकर चालु करा म्हणुन थापडाने मारहाण करून शासकीय कामात अडथळा निर्माण केला. वगैरे **फिर्यादी अजय संभाजी इगवे, वय 40 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. यशवंतनगर, हदगाव ता. हदगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हदगांव** गुरनं 93/2024 कलम 353, 323 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री असद शेख, मो.क्रं. 9405000786** हे करीत आहेत.

## 6)अवैध गुटखा बाळगला :–

**धर्माबाद :–** दिनांक 30.03.2024 रोजी 15.15 वा. चे सुमारास, **एस. एस. टी. पॉईंट बन्नाडी चौक ता. धर्माबाद जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने स्वतःचे आर्थीक लाभासाठी बिना परवाना बेकायदेशिररित्या विवीध कंपणीचा गुटखा किंमती 71,500/–रूपयाचा माल वाहन क्रमांक टीएस–18/टी–0279 किंमती 1,20,000/–रूपयाचे असा एकुण किंमती 1,91,500/– रुपयाचे मालासह चोरटी विक्री करण्याच्या उदेशाने वाहतुक करीत असतांना ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2022 सोमनाथ शंकरआप्पा मठपती, ने. पोस्टे धर्माबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे धर्माबाद गुरनं 83/2024** कलम 328, 272, 273, भादवी सह कलम 26(2), 27, 23 30(2),59(आयव्ही), अन्न सुरक्षा मानदे कायदा 2006 अधिनियम 2011 चे कलम 26 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास मपोउपनि/श्री पवार, मो.क्रं. 8830330790** हे करीत आहेत.

## 7)विवाहीतेचा छळ :–

**1)लोहा :–** दिनांक 28.08.2018 रोजी ते दिनांक 04.12.2018 चे दरम्यान, **फिर्यादीचे सासरी मौ. पोलीसवाडी ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील नमुद आठ आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तु दिसायला चांगली नाहिस, तुला स्वंयपाक करता येत नाही तुझ्या आई वडिलांनी लग्नात हुंडा कमी दिला,तुला मुल बाळ होत नाही. असे म्हणुन फिर्यादीस शिवीगाळ व मारहाण करून, शारिरीक व मानसीक छळ केला व फिर्यादी हयात असताना त्यांचे पतीने दुसरे लग्न केले व जिवे मारण्याची धमकी दिली.वगैरे **फिर्यादी 30 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लोहा** गुरनं 104/2024 कलम 498(अ),494,323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउनि/बगाडे, मो.क्रं. 7775901279** हे करीत आहेत.

**2)उस्माननगर :–** दिनांक सन 2020 ते दिनांक 30.03.2024 रोजी पावेतो दरम्यान, **फिर्यादीचे सासरी मौ दृकामठाळा तांडा ता. किनवट जि. नांदेड ह.मु. कांजळा तांडा ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील नमुद सहा आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस माहेरहुन हुंडा घेवुन येत नाहीस तो पर्यत तुला मुल होवु देणार नाही व तुला नांदवुन घेणार नाही असे म्हणुन फिर्यादीस तिचे पोटावर लाथ मारल्याने पोट दुखुन त्रास होवुन तिचे गर्भापात व्हावा या उदेशाने तीस शिवीगाळ व मारहाण करून, शारिरीक व मानसीक छळ केला व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 23 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उस्माननगर** गुरनं 50/2024 कलम 498(अ),323,504,313,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री गाडेकर, मो.क्रं. 9823148435** हे करीत आहेत.

## 8)जुगार :–

**1)कंधार :–** दिनांक 29.03.2024 रोजी 21.30 वा. चे सुमारास, **महाराणा प्रताप चौक जवळ मराठवाडा ज्युस सेंटर बाजुला कंधार ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या लोकांकडुन पैसे घेवुन क्रिकेट मॅचवर सट्टा नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना एकुण किमंती 41,000/–रूपयाचा मुदेमाल व जुगाराचे साहित्यसह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री दतात्रय नरहरी काळे, ने. पोस्टे स्थागुशा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कंधार** गुरनं 104/2024 कलम 12(अ) म.जु.का. प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री मुळे,** हे करीत आहेत.

**2)वजिराबाद :–** दिनांक 30.03.2024 रोजी 14.45 वा. चे सुमारास, **वाईन्स कलामंदिरचे पाठीमागे नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या लोकांकडुन पैसे घेवुन टाईम बाजार नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना एकुण किमंती 1990/–रूपयाचा मुदेमाल व जुगाराचे साहित्यसह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सपोनि/श्री राजु दताराव वटाणे, ने. पोस्टे वजिराबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 155/2024 कलम 12(अ) म.जु.का. प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1742 खानसोळे, मो.नं. 9823101742** हे करीत आहेत.

## 9)प्रोव्हिबीशन :—

**1)मुक्रामाबाद :—** दिनांक 30.03.2024 रोजी 17.30 वा. चे सुमारास, **मौ. जिरगा टिन पत्राचे दुकानात ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 2800/—रूपयाची चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री अमर सुरेश केंद्रे, ने. पोस्टे मुक्रामाबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुक्रामाबाद** गुरनं 62/2024 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/ 2605 पवार, मो.नं. 7620481485** हे करीत आहेत.

**2)हिमायतनगर :—** दिनांक 30.03.2024 रोजी 11.30 वा. चे सुमारास, **मौ. दरेसर ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या हातभट्टी गावठी दारू किंमती 3000/—रू ची चोरटी विक्री करण्याचे उद्देशान ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2204 बालाजी दादाराव पाटील, ने. पोस्टे हिमायतनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरनं 75/2024 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/ 2204 पाटील, मो.नं. 9765999899** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड